
' तगर ते तेर '
-दिपक खरात

# तगर ते तेर

दिपक खरात

ई साहित्य प्रतिष्ठान

# तगर ते तेर (tagar te ter)

लेखक : दिपक खरात, तेर, ता. जि. उस्मानाबाद, महाराष्ट्र

deepakkharat7@gmail.com

ph : 7588877287

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

©esahity Pratishthan® 2014

# तेर

महाराष्ट्राला हजारो वर्षांचा इतिहास आहे. मराठी भाषा २३०० वर्षे बोलली आणि लिहिली जाते. सुमारे बाविसशे वर्षांपुर्वी ग्रीसमधील एक प्रवासी पेरिप्लस याने युरोप, आफ्रिका, अरबस्थान आणि संपूर्ण भारताचा प्रवास केला. त्याने लिहून ठेवले आहे की (Periplus of the Erythraean Sea, Chap. 41) जगातील सर्वात सुपीक व समृद्ध प्रदेश त्याने भारतात पाहिला. व तो होता मराठवाडा. (आताच्या मराठवाड्याची अवस्था पाहून हे खरं वाटणार नाही ना?) त्यावेळची जगातील सर्वात मोठी आणि श्रीमंत बाजारपेठ होती उस्मानाबाद मधली तगर ही नगरी (म्हणजे आताचे तेर). या बाजारात जगभरातून सर्वोत्कृष्ट धातू, कापड आणि अन्नधान्य (आणि दारू) विक्रीला आणली जात असे. इटाली(रोम), ग्रीस, अरबस्थान, चीन अशा देशांतून मोठमोठे व्यापारी इथे येत. (जवळच जगातील सर्वात महत्त्वाचे धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्या विनिमयाचे केंद्र प्रतिष्ठान (आताचे पैठण) होते. ज्या काळी आजचं इंग्लंड , फ्रांस वगैरे रानटी अवस्थेत होते आणि तिथले लोक डोंगराच्या गुहांत किंवा झाडांच्या ढोलीत रहात तेव्हा या या मराठवाड्यात स्थापत्यशास्त्राचे प्रयोग होत होते. वस्त्रांचे उंची नमूने वापरले जात होते आणि ज्ञानविज्ञानाच्या चर्चा होत असत.

अशा या तेर नगरीबद्दल अनेक इतिहासकारांनी पुस्तके लिहीली आहेत. ग्रंथ आहेत. पण सर्वसामान्य लोकांच्या भाषेतलं असं बहुधा हे पहिलंच पुस्तक असेल. हे पुस्तक वाचताना वाचकांना अनेक आश्चर्याचे धक्के बसतील. कारण आपल्याला आपल्या महाराष्ट्राबद्दल फ़ारसं काही माहितच नसतं. म्हणून आम्हाला प्रा. दिपक खरात यांचे विशेष आभार मानावे लागतील.

प्रा. दिपक खरात यांनी अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर हे पुस्तक लिहीले आहे याची साक्ष शेवटच्या पानावरचे संदर्भ ग्रंथ देतीलच. हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांपर्यंत आणि विशेषतः तरुणांपर्यंत न्यायला हवं. याकामी तुमची मदत हवी मित्रांनो.

आपले नम्र

ई साहित्य प्रतिष्ठान

# समर्पण

जिने इथली तेजःपुंज ऐतिहासिक मुल्ये जपली . . .

जिच्या मंगल कुशीत वैराग्यशिरोमणी

गोरोबा काकांचा जन्म झाला . . .

जिच्या उबदार मायेत श्री विठ्ठल व

सर्व संताना यावेसे वाटले. . .

जिने एका अभुतपूर्व सुवर्णकाळासह

भक्ती, ज्ञान, वैराग्याचा स्पर्श अनुभवला . . .

आणि जिने आपल्या पावन ओटीत अजूनही

चैतन्याच्या कृपेसोबत श्रध्देचा संस्कार जपला आहे ;

त्या तेरणेच्या पंचक्रोशीतील पवित्र मातीस

हे पुस्तक अभिवादनासह सविनय समर्पित.

-दिपक खरात



## मनभावना

तगर ते तेर हे लहानसे पुस्तक आपणा सर्वांच्या हाती सुपूर्द करीत असतांना खरोखर माझे मन हर्षोल्हासीत झाले आहे. माझ्यासाठी अभिमानास्पद असणारा माझा हा गांव कधी काळी समृध्द अशा ऐतिहासिक, धार्मिक व आर्थीक संपन्नतेचा साक्षीदार होता ,हे आजचे तेर पाहिल्यासही उमगू लागते. काळाच्या पडद्यामागील इतिहासाची पाने चाळतांना या भूमीच्या अनेक पैलूंचे दर्शन होऊ लागते आणि त्यातला जाणकार माणूस मग तिच्या प्रेमात पडतो. तरीही मागील पंधरा - वीस वर्षापासून  माझ्या मनात मात्र एक खंत आहे की, जेवढे या मातीचे ऐतिहासिक व धार्मिक मुल्य आहे त्या तुलनेने या भूमीच्या वैभवाचा वारसा उजेडात आणण्यासाठी अपेक्षे एवढे प्रयत्न झालेले नाहीत. या अनुषंगाने माझा असणारा खारीचा वाटा उचलण्याचा हा आनखी एक अल्पसा, प्रयत्न मी करतो आहे एवढेच ; पण प्रामाणिक प्रयत्नाच्या पाठीमागे संपूर्ण अस्तित्व, ते अनामिक चैतन्य उभा राहते असे म्हणतात. हाच माझा आशावाद आणि हीच माझी श्रध्दाही.

तरीही हा माझा अट्टाहास  तगर अथवा तेर या नामाभिदानाचा विचार करता उगीचच केलेला नाही. तो अट्टाहास हेतुपूरस्सर करण्यायोग्य ही नगरी आहेच. या पौराणिक सत्यपुरीची धार्मिक योग्यता आणि ऐतिहासिक तगरची संशोधनात्मक मौलीक पात्रताच मला हे लिहीण्यास बांधील करते. तेर म्हणजे संत गोरोबा काकाआणि गोराबाकाका म्हणजे तेर हे समीकरण महाराष्ट्रातील भागवत सांप्रदायाच्या परंपरेतील सर्वांना व इतरही अनेकांना माहित आहे. पण त्याच बरोबर हे प्राचीन तगर सातवाहनाच्या काळातील साडेसहा मैलाचा विस्तार असणारे आर्थीक राजधानी म्हणून  प्रचलित  व उपराजधानीचा दर्जा असलेले समृध्द शहर होते ,हे तज्ञांचे मतही लक्षात घेतले पाहिजे. आजही या परिसरातल्या अनेक गोष्टी पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करुन घेवू शकतात ,फक्त त्या सर्वांसमोर मांडण्याची गरज आहे. तेरमध्ये त्रिविक्रम मंदीर, उत्तरेश्वर मंदीर, कै. रामलिंगअप्पा लामतुरे पुराणवस्तु संग्रहालय, नृसिंह, कालेश्वर, सिध्देश्वर मंदीर अशी कांही प्रेक्षणिय ठिकाणे तर आहेतच तरीही सहज म्हणून कांही मजेशीर रंजक स्थळे सांगतो . . . या साडेसहा मैलाच्या विस्तारातले आजचे डकवाडी हे गांव. येथे ऋषी अगस्तींच्या आश्रमाची जागा आहे. हे अगस्ती ऋषी जिथे बसून ज्ञानदान करायचे त्या जागेवर त्यांच्या मुर्ती स्थापित आहेत.

पुर्वी येथे मंदीर नव्हते तेंव्हा बेलाची दोन झाडे उगवली आणि ती या ऋषीवर्यांना छाया देण्यासाठी निसर्गत: नव्वद व साठ अंशाच्या कोनात वाकली जी आपण आजही पाहू शकतो. या प्राचीन सीमारेषेतील असेच एक अर्वाचीन खेडे म्हणजे हिंगळजवाडी. या ठिकाणी हिंगळजआई म्हणून प्रसिध्द असलेले हिंगुल अंबीकेचे मंदीरआहे. या मंदीरासमोर एक रेखीव नंदी व शिवालय आहे. या मंदीरातील शिवपिंड ही शिल्पकलेचा एक सुंदर नमुना आहे. या शिवलिंगाचे वैशिष्ट्य असे की, ते अचल असूनही स्वत:भोवती गोलाकार फिरु शकते.अशीच एक छोटीसी वाडी म्हणजे भंडारवाडी . या ठिकाणी असणाऱ्या सिध्देश्वर महादेवाच्या पिंडीला साळुंका नाही. तिथे खोलवर असणारा एक खड्डा आहे ज्यातून आजही पाणी येते. या पाण्याचे वैशिष्ट्य असे की, पावसाळ्यात अधिक पाऊस पडला म्हणून जशा कुपनलिका वाहतात तसे ते वाहणारही नाही आणि प्रचंड मोठा आवर्षणाचा दुष्काळ पडला तरी ते पाणी आहे त्यापेक्षा खालीही जाणार नाही, आटणार नाही. ते अगदी आहे तेवढेच रहाते. हे पाणी ओंजळीने बाहेर काढून टाकले तरी पुन्हा चार-पाच तासात आहे तेवढेच होवून बसते. तेरमध्ये सद्‌गुरु जंगलेश्वर महाराजांचे मंदीर आहे. येथे त्यांच्या साधनेच्या जागेशेजारी असणारे वडाचे झाड महाराजांच्या तत्कालीन आज्ञेप्रमाणे मोठे होत नाही.

त्याच्या पारंब्यासुध्दा अधिकच्या वाढत नाहीत, आहेत तेवढयाच राहतात अशी अख्यायीका येथे प्रचलित आहे. किंवा उभ्या भारतातील सर्व शिवालये आठवून पहा . . . त्यातल्या शिवपिंडीची दिशा ही उत्तरेकडे मुख करुनच असते पण तेरमध्ये चारही दिशाना तोंड करुन स्थापिलेल्या शिवपिंडी किंवा शिवमंदीरे दिसून येतील. म्हणजे त्रिविक्रम मंदीरातील मेंढेश्वर महादेव पूर्वेकडे मुख करुन स्थापिलेला आहे तर गोराबाकाकांच्या समाधी मंदीरापाठीमागे कालेश्वर मंदीराच्या कोपऱ्यातील निलकंठेश्वर पश्चिमेकडे मुख करुन स्थापीत आहे. व्यासांच्या शेतातील जलकुंडाच्या शेजारी मंदीराचे अवषेश मिळाल्याचे कांही संशोधक सांगतात. त्याचे पौराणिक ग्रंथातील नावच दक्षिणेश्वर होते असे म्हटले जाते. तर तेर मधील इतर सर्व शिवलींग उत्तरेकडे मुख करुन प्रतिस्थापित आहेत. या शिवाय या परिसरातल्याही अनेकांना माहित नाही की, जैन धर्मियांचे चोवीसावे तिर्थंकर भगवान महावीर या ठिकाणी येवून गेलेले आहेत. त्यांचे समवशरण आलेले हे दक्षिण भारतातील एकमेव ठिकाण असल्याचे सांगीतले जाते. या सर्व व इतरही गोष्टी लोकांसमोर याव्यात एवढीच माझी इच्छा आहे.

या पुस्तकाची भाषा मी सर्व सामान्य पण जाणत्या वाचकांना कळेल अशी जाणीवपूर्वक साधी सोपी व सरळ ठेवलेली आहे. जास्तीत जास्त लोकांपर्यंत या प्राचीन नगराचा इतिहास अगदी सुलभतेने पोहोंचावा एवढाच माझा या पुस्तकामागचा शुध्द हेतू आहे. इतिहासाच्या अभ्यासकांना व संशोधकांना या पुस्तकातून मी खुप संदर्भ पुरविणार आहे असाही माझा दावा नाही पण त्यांना मी संकेत जरुर करु इच्छितो. सदरील पुस्तकामुळे कुणास ठाऊक, या सर्वांना कदाचित प्रत्यक्ष तेर दर्शनाची ओढही निर्माण होईल. मला इतकेही पुरेसे आहे.

बाकी यापूर्वी ज्यांनी ज्यांनी या प्राचीन शहरावर कांही वैशिष्ट्यपूर्ण काम केले आहे त्यांना मी इथला रहिवाशी म्हणून मनापासून धन्यवाद देतो. महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग मुंबई, श्री. संत गोरोबा काका व शिवमंदिर ट्रस्ट तेर, भगवान महावीर ट्रस्ट तेर, माझे प्रसिध्दी प्रमुख श्री.सतिश कुंभार, यांच्यासह या पुस्तकासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष स्वरुपात मला प्रोत्साहित करणा-या सर्वांचा मी ऋणी आहे.

प्रत्यक्ष भेट तर नाहीच नाही पण साधा दुरध्वनी संपर्कही न होता केवळ ई-मेल वरील पत्रसंदर्भान्वये माझे हे पुस्तक हजारो वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करणाऱ्या ई-साहित्य प्रतिष्ठानच्या टीमचे काम केवळ **आभार** या शब्दात मावणारे नाही. त्यांचे अगदी अंत:करणापासून कौतुक व पुढील कार्यास शुभच्छा.

लहानशा तरीही महत्वपूर्ण असणाऱ्या या पुस्तकाचे आपण निश्चित स्वागत करणार आहात याची खात्री वाटते पण तरीही सर्वांना एक नम्र आवाहन करु इच्छितो की, वाचा आणि तुमच्या प्रतिक्रीया कोणत्याही माध्यमाने जरुर कळवा कारण कोणत्याही लेखकाच्या नवनिर्मीतीसाठी याहून मोठी प्रेरणा दुसरी कोणतीही नसते. वाचकांचा अभिप्राय हा लेखकांसाठी एखाद्या मोठया पुरस्काराहूनही अधिक आनंददायी असतो हे लक्षात असू द्या. याहून अधिक काय लिहू ? अंतिमत: सर्वांसाठी हृदयीची भावना म्हणून एकच शब्द . . . धन्यवाद ।



**-दिपक खरात**

मु. पो. तेर (गोरोबाकाकांचे)

ता. जि. उस्मानाबाद [भ्र. क्र. ७५८८८७७२८७]

# 'तगर ते तेर'

वैराग्यनगरी तेर म्हणजे पौराणिक 'त्रयोदशा' व अर्वाचिन तेरणा नदीच्या दक्षिण काठावर, समुद्रसपाटीपासून साधारणपणे २००० फुट उंचीवर वसलेले एक सुंदर असे प्राचीन गाव. पूर्वी हिंदू, बौध्द, जैन या धर्मियांचे आणि शैव व वैष्णव पंथाच्या अनुयायांचे वसतिस्थान असणाऱ्या या जगकल्याणी नगरीचे ऐतिहासिक महत्व जाणून घेण्यासाठी आपणाला इसवीसनाच्या पहिल्या शतकापर्यंत किंबहुना त्याही पाठीमागे जावे लागेल. ऐतिहासिक संदर्भानुसार तगर, तगरनगर, तगरुर, तगरपूर, तेरापूर, तैर, थेर आणि पौराणिक संदर्भानुसार त्रिगर , तेगर शिवाय कृतयुगात शांतापुरी, त्रेतायुगात सत्यपुरी, द्वापार युगात कनकपूरी अथवा कंकावती व कलियुगात सिध्दाश्रम अशा अनेक नावांनी सुपरिचित असलेल्या या नगरीचा संस्कृत भाषेत तगरम् तर कन्नड भाषेत तारिकाडू असाही उल्लेख सापडतो. एके काळी ही मोक्षदायिनी भूमी आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र, कलाशिल्प नगरी व सातवाहनांची आर्थिक राजधानी म्हणून सुप्रसिध्द होती. तेव्हा भडोच-तेर ते उज्जयीनी हा प्रमुख व्यापारी मार्ग तर होताच पण त्याचबरोबर अरबी समुद्र ते बंगालचा उपसागर यांना जोडणाऱ्या पूर्व-पश्चिम राजमार्गावरील हे प्रमुख ठाणे होते.




म्हणजे सुरुवातीला रोमन साम्राज्याशी होणारा व्यापार मसुलीपट्टण, विनुकोंडा, भाग्यनगर, तगर, पैठण मार्गे भडोच येथून भूमध्य समुद्रामार्गे ग्रीक, रोमन साम्राज्य असा होता.

नंतरच्या काळात सातवाहनांचे दक्षिणेतील स्थलांतर झाल्यावर साधारणपणे इ.स. १८० ते २३० या कालावधीत व्यापाराची दिशा बदलली. क्षत्रपांनी पश्चिम किनारपट्टी व्यापल्यामुळे विशाखापट्टण, मसुलीपट्टन मार्गे श्रीलंकेला वळसा घालून रोमन साम्राज्याकडे व कांहीसा माल आग्नेय आशियाकडे निर्यात झाल्याचे दिसते. शिवाय तेरच्या उत्खननातील अवशेषावरुनही या नगराचा आंध्रप्रदेशातील अमरावती व मसुलीपट्टन बंदराशी संपर्क असल्याचे संकेत प्राप्त झाले आहेत. हा संपर्क अर्थातच सन्नती मार्गे होता.

शिवाय सन्नतीचाही पश्चिम महाराष्ट्राशी संपर्क होता हे तेथील सातवाहनकालील शिलालेखातील नाशिकच्या उल्लेखावरुन स्पष्ट होते. हा संपर्क अर्थातच तेर मार्गे होता हे उघड होय. यावरुन त्याकाळी अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांना जोडणारा जो पूर्व-पश्चिम राजमार्ग होता त्यावरील प्रमुख ठाणी म्हणून तेर व सन्नती यांच्यात सतत दळणवळण होते. सन्नती व नाशिक यांच्यातील राजमार्ग तेर पासून वायव्य दिशेने पैठणहून पुढे जात होता. तगर ते प्रतिष्ठाण व प्रतिष्ठाण ते उज्जैयनी, महिश्मतीपासून राजगृहापर्यंत हे सर्व व्यापारी मार्ग सार्थवाहनांच्या लोंढयांनी फुललेले असत. याभागात देशाच्या विविध भागातील अधिकारी, व्यापारी, भिक्षू, विविध धर्मांचे अनुयायी सतत भेट देत असत असेही संशोधकांचे मत आहे. त्याकाळी या तेजस्वी नगरीने समृध्दीचे शिखर गाठले होते. 'पेरीप्लस ऑफ दी एरिथ्रियन सी' या ग्रीक देशीय ग्रंथातील उल्लेखानुसार युरोपमधील रोम व ग्रीस देशाशी इथले व्यापारी संबध होते. कोणे एकेकाळी सभोवती असणाऱ्या लाकडी तटभिंतीचे पुरावे उपलब्ध झालेल्या या नगराचा इजिप्तबरोबरही धागा जुळल्याचे संकेत मिळतात. शिवाय शक, कुशाण व इराणी व्यापारी सुध्दा येथे येत असावेत, असे या ठिकाणी सापडलेल्या कलाअवशेषावरुन वाटत राहते.

'पेरीप्लस ऑफ दी एरिथ्रियन सी' हा इ.स.५० ते १०३ या काळात एका ग्रीक देशीय खलाशाने लिहीलेला ग्रंथ ... या ग्रंथाच्या ५१ व्या प्रकरणामध्ये दक्षिणपथातील महत्वाच्या व्यापारी केंद्राबाबत माहिती मिळते.

दछिनाबदेस (दक्षिणापथ) या प्रदेशातील व्यापारी नगरामध्ये दोन स्थलांचे महत्व विशेष आहे. यातील पहिले बॅरिगाझा (गुजरातेतील भरुच किंवा भडोच) पासून दक्षिणेस २० दिवसांच्या प्रवासाने गाठता येणारे पैठण आणि दुसरे म्हणजे तगर. तगर हे फार मोठे शहर असून तेथे पैठणहून पूर्वेस दहा दिवस प्रवास केल्यानंतर पोहोंचता येते. पैठणहून बॅरिगाझा येथे उजाड माळरानातून मार्ग काढीत गाडया भरभरुन लोहितांक दगड (Carnclian) आणला जातो. या उलट तगर येथून साधे कापड, विविध तऱ्हेची मलमल आणि गोणपाट बॅरिगाझा येथे पाठविला जातो. त्याचप्रमाणे समुद्र किनारपट्टीच्या प्रदेशातून तगरला येणारा निरनिराळा मालही तगरहून बॅरिगाझा येथे पाठविला जातो असे वर्णन या ग्रंथात आले आहे.

कांही तज्ञांच्या मते या ठिकाणाहून मातीची भांडी, शंखाच्या बांगड्या, शाडूच्या वस्तु, सुती व तलम कापड (साधे कापड, विविध तऱ्हेची मलमल व गोणपाट) इत्यादी वस्तूंचा व्यापार सुरु असायचा.

पैठणच्या रेशमी वस्त्रांबरोबरच तेरच्या सुती व तलम वस्त्रांनी पाश्चात्य जगतास भुरळ घातली होती. कारण अनेक तत्कालीन पाश्चात्य लेखकांनी तेरच्या तलम कापडाची स्तुती केल्याचे आढळून आले आहे ते यामुळेच. रोमन इतिहासकारांच्या मते तेर ही २००० वर्षापूर्वी दक्षिणेतील सर्वात मोठी बाजारपेठ व सुमारे सहा ते साडेसहा मैल विस्तारलेले नगर होते. आपल्या वैभवाच्या शिखरावर असताना तेर नगराचा व्यास बराच विस्तीर्ण होता. तेरची वस्ती तेरणा नदिच्या दोन्ही तीरावर होती. तेरच्या आग्नेयेस असलेल्या ईर्ला या गावापर्यंत नदिच्या दोन्ही काठांवर प्राचीन वस्त्याचे अवशेष आढळून आले आहेत. पश्चिमेकडील धाराशिव लेणी व वायव्येकडील तेरखेडा यांचाही समावेश प्राचिन तगर नगरच्या हद्दीत होत असावा असे कांही संशोधकाना वाटते, पण तेर ते तेरखेडा यामधील अंतर गृहीत धरता याबाबत तशी खात्री देता येत नाही.

उपराजधानीचा दर्जा असणाऱ्या या वैभव संपन्न परंपरेच्या ऐतिहासिक वारशानेच इ. स. ९९७ च्या शिलाहार घराण्यातील अपराजित यांच्या लेखात तगरपूर परमेश्वर असे बिरुद अपराजिताने स्वतःला लावून घेतले. इ. स. १०५८ मधील लेखात कऱ्हाड शाखेच्या घराण्यातील मारसिंहाने स्वतःला तगरपुरवराधिश्वर ही पदवी आपला गौरव म्हणून प्रचलित केली हे खरे वाटू लागते.

## तेरच्या भोवताली असणाऱ्या व तगरच्या प्राचीन अस्तित्वाची साक्ष देणाऱ्या टेकड्यांची नांवे: -

१.साहोत्रे टेकडी २. तेली टेकडी ३. मुलाणी टेकडी
४.महार टेकडी ५. कोट टेकडी ६. सुलेमान टेकडी
७.कैकाडी टेकडी ८. रेणूका टेकडी ९. सुतार टेकडी
बैरागी टेकडी

या मधील कांही टेकड्या सध्या अस्तित्वात आहेत तर कांही टेकडयांची माती काढल्याने यामधील कांही उध्वस्त तर कांही नाहीशा झाल्या आहेत.



### तेरमधील उत्खनने :-

तेर मधील सर्व लहान मोठी उत्खनने वचारांमध्ये घेता या ठिकाणी आजपर्यंत जवळपास सात ते आठ वेळा उत्खनन करण्यात आले आहे.

| उत्खनन क्रमांक | उत्खननाचे वर्ष | माहितीचा तपशील | या उत्खननाने सिध्द केले |
|---|---|---|---|
| प्रथम व द्वितीय उत्खनन | १९२९-३०<br>१९६० | * निजाम शासनाच्या पुरातत्व खात्याने तेर येथील त्रिविक्रम मंदिराचे जतन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले<br>* तेर येथील मंदिराविषयी डग्लस बॅरेट यांने पुस्तिका प्रकाशित केली. | * या माधून तेरची सातवाहन कालीन समृध्दता प्रकाशात आली, स्पष्ट झाली |
| तृतीय उत्खनन | १९५८ | * चाफेकर व बॅनर्जी यांनी केलेले उत्खनन ... ज्या´मध्ये त्यांनी कालखंडाची ´मांडणी केली. | * तेरचे धार्मिक महत्व स्पष्ट करणारा सोळा आऱ्यांचा, दक्षिणात्य शैलीचा भव्य स्तूप उपलब्ध झाला. |
| चतुर्थ उत्खनन | १९७५ | * डॉ. श. भा. देव आणि डॉ. टी.व्ही. पथी यांनी केलेले उत्खनन | * कधीकाळी तेर भोवती असणाऱ्या लाकडी तटभिंतीचे अवशेष सापडले... प्लीनीने अशा तीस तटबंधीयुक्त सातवाहन कालीन वसाहतींचा संदर्भ दिला होता. |

## इतर लहान मोठी उत्खनने - राज्य पुरातत्व वभाग :-

सन १९६७-६८ तसेच

सन १९९२-९३ मध्ये कोट

परिसरात उत्खनन करण्यात आले.

सन १९९७-९८ मध्ये व्यास यांच्या शेतात उत्खनन केले गेले.

सन १९८९-९० मध्ये भातभागे यांच्या शेतात उत्खनन करण्यात आले.

तेर मध्ये उत्खनन व अभ्यास करणाऱ्या डॉ.मोरेश्वर दीक्षितांच्या मते येथील प्राचीन वसाहतीं मध्ये एक प्रकारचे सातत्य आहे. इ. स.च्या पूर्व ३०० ते इ. स. १६ व्या १७ व्या शतकापर्यंतच्या प्रदीर्घ काळात शिल्लक वसाहतींचे अवशेष मिळाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. याच अनुशंगाने त्यांनी येथील वसाहतींचे प्रमुख पाच कालखंड केले आहेत.

| कालखंड क्रमांक | कालावधी /काळ | ´माहितीचा तपशील |
|---|---|---|
| प्रथम कालखंड | मौर्य व मौर्यकाळ | या वसाहतींचा नाश पुरामध्ये झाला |
| ि द्वितीय कालखंड | पूर्व सातवाहन काळ | एका उत्खननात या कालखंडातील वसाहतीभोवती लाकडी तटभिंतीचे पुरावे उपलब्ध झाले. |
| तृतीय कालखंड | उत्तर सातवाहन काळ | तेरची मोठ्या प्रमाणात भरभराट.<br>रोम बरोबरच्या व्यापारात वाढ.<br>हा काळ इ.स.च्या तिसऱ्या शतकातील पहिल्या चतुर्थकाच्या शेवटी सातवाहनांच्या अस्ताबरोबर लयास गेला. |
| चतुर्थ कालखंड | स्थूल मानाने गुप्त चालुक्य कालखंड | त्रिविक्रम व उत्तरेश्वर मंदिराची निर्मिती |
| पंचम कालखंड | माध्ययुगीन काळ | या काळाची साक्ष तेर येथे उपलब्ध शिलालेख व जैन मंदिरे देतात. |

## तेर - तगर - स्थल निश्चिततेचे गूढ :-

प्राचीन तगर म्हणजेच आजचे तेर आहे या बाबत सुरुवातीला अनेक मत मतांतरे होती. अनेक विद्वानांनी हे गूढ उकलण्याचा आपापल्या परीने प्रामाणिक प्रयत्नही केला, मात्र यामध्ये विभिन्न स्वरुपाचे विचार प्राथमिक कालावधीत पुढे आले. याला कारणही तसेच होते. पेरीप्लसच्या म्हणण्यानुसार पैठणच्या पूर्व दिशेस दहा दिवस प्रवास केल्यानंतर तगर येथे पोहोचता येते असे नमूद होते तर या उलट टॉलेमी यांने लिहीलेल्या पुस्तकात तगर हे पैठणच्या इशान्य दिशेस आहे असा उल्लेख होता. प्रत्यक्षात तेर हे पैठणच्या आग्नेय दिशेस कांहीसे पूर्व बाजूला साधारणपणे ९४ मैलावर म्हणजेच सुमारे १५४ किलोमीटर इतक्या अंतरावर आहे यामुळे तगर हे नेमके कोणते व कोठे असायला पाहिजे या बाबत अनेक संशोधकांनी मांडलेल्या विचारामध्ये स्पष्ट अशी मतभिन्नता होती.

या अनुशंगाने विलफोर्ड, व्हिन्सेंट, मॅनर्ट व रिटेर यांनी तगर म्हणजे दौलताबाद जवळील देवगड असले पाहिजे असे सांगीतले. तर भगवानलाल इंद्रजी यांनी तगर म्हणजे जुन्नर आहे असे प्रतिपादित केले. याला आधार म्हणून तगर हे नाव त्रिगीरी म्हणजे तीन टेकडया या पासून आले असावे असे नमुद करतानाच अशा तीन टेकड्या जुन्नर नजिक (अनेक बौध्द लेण्यांसहीत) असल्यामुळे तगर म्हणजेच जुन्नर असल्याचे त्यांनी लिखित स्वरुपात म्हटले.

याच बरोबर युल यांने तगर म्हणजे कर्नाटकातील गुलबर्गा , तर ग्रँट डफ यांने मराठवाडयातील बीड जवळ प्राचीन तगर असायला पाहिजे असा अंदाज सांगितला. वि.का.राजवाडे यांनी कनकगिरी पासून उत्तरेस सहा कोसांवर असलेले तवरगिरी, तावरगेरे किंवा तवरेसर म्हणजे तगर असले पाहिजे असे मत मांडले तर डॉ. फ्लीटने सुरुवातीला बॉंबे गॅझेटियरमध्ये तगर म्हणजेच कोल्हापूर किंवा करवीर असे नवेच मत मांडले पण नंतर त्यांने पूर्वीचे आपले मत बदलून प्राचिन तगर म्हणजेच आजचे तेर असल्याचे ठामपणे सांगीतले.

पैठणच्या आग्नेय दिशेस असणाऱ्या धारुरचा मेळ तगरशी घालणाऱ्या श्री.भांडारकरांसह तगर विषयी अनुमान काढणाऱ्या जवळपास सर्वच संशोधकांचा प्राथमिक अंदाज चुकीचा निघाला व पुढे सन १९०१ च्या माहे नोहेंबरमध्ये ब्रिटीश संशोधक हेन्री कझिन्स यांनी तेर येथे येऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीनंतर तेर येथील विविध प्राचीन वस्तूंची माहिती भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याच्या १९०२-१९०३ च्या वृत्तांतामध्ये प्रसिध्द केली ज्यामध्ये तगर म्हणजेच तेर असल्याचे स्पष्ट केले गेले. यावरुन प्राचीन तगर नगरीचा तेरशी पुराव्यानिशी संबंध जोडण्याचे काम फ्लीट व कझिन्स यांनी केले असे म्हणावे लागेल.

शिवाय नंतरच्या काळात तेर या ठिकाणी  सापडलेल्या पुराभिलेखांमधून, शिलालेखावरुन आणि येथील उत्खननातील अवशेषांसह इतरही कांही ठिकाणी उपलब्ध झालेल्या ताम्रपटातून तेर हेच पूर्वीचे तगर होते याची निश्चित खात्री पटत गेली. या सर्व संदर्भानुसार प्राचीन तगरची स्थलनिश्चिती करण्यात बिलफोर्ड, व्हिसेंट, मॅनर्ट, रिटेर, भगवानलाल इंद्रजी, युल, ग्रँट डफ, राजवाडे, भांडारकर, फ्लीट, कझिन्स व त्यानंतरच्या अध्ययन करणाऱ्या अनेक विद्वानांचे योगदान आहे असेच म्हणावे लागेल.



## बौध्द धर्म आणि तेर :-

तेरचा बौध्द चळवळीशीही अगदी सुरुवातीपासूनच संबंध आला असावा असे वाटते. स्थवीरवादी, येशवादी सांप्रदायाचे या परिसरात अधिक्य असल्यानेही या केंद्रास थेर हे नांव प्राप्त झाल्याचे म्हटले जात आहे.

सातवाहनोत्तर कालखंडात बौध्दपीठ म्हणून तेरचे महत्व अतिशय वाढले असावे की त्याचा संबंध आंध्रप्रदेशातील अमरावती, नागार्जून तांडा, आदि नगराशी प्रस्थापित झाल्याचे तेर मधील बौध्द अवशेषावरुन स्पष्ट झाल्याचे संशोधक सांगतात.

र्‍हाइस डेविड्स यांनी आपल्या बुध्दिस्ट इंडिया या ग्रंथात तेर येथील बौध्द धर्माचा इतिहास बुध्द काळापर्यंत म्हणजे इ.स. ५ व्या व ६ व्या शतकापर्यंत मागे जाऊ शकेल, अशी माहिती नमूद करुन ठेवली आहे.अनेक बौध्द जातक कथांमध्ये तगर शिखीन नावाच्या बौध्द आचार्याचा उल्लेख असल्याच्या आधारे त्यांनी शिखिन हे त्या आचार्याचे नांव आणि तगर हे त्याच्या वास्तव्याचे ठिकाण असल्याचे प्रतिपादित केले. र्‍हाइस डेव्हिड्स यांचे प्रतिपादन पटण्यासारखे आहे.कारण बुध्दाला भेटण्यापूर्वी ज्याअर्थी नांदेड-बोधन परिसरातील गोदावरीकाठच्या आश्रमातून बौध्द धर्माचा प्रभाव या परिसरात बुध्दाच्या जीवनकाळातच पडू लागला होता हे दिसून येते. तेंव्हा त्या आश्मक राज्यात असणाऱ्या तगर येथील शिखीन या आचार्याला बौध्द संघात स्थान प्राप्त असल्यास ती बाब काल्पनिक वाटू नये. याचा अर्थ दक्षिणेकडील बौध्द धर्म प्रसारात तेरने महत्वाची भूमिका पार पाडली असावी असेही वाटते. यातूनच येथे बौध्दधर्मियांच्या अनुयायांची व बौध्द व्यापाऱ्यांची ये-जा बऱ्याच प्रमाणात झाली असावी.

बौध्द व्यापाऱ्यांच्या वसाहती येणारे तेर पश्चिम किनारपट्टीच्या व्यापारी महामार्गावरील महत्वाचे ठिकाण असल्याने येथे अनेक स्तूप व चैत्यगृहे बांधली गेली होती. १९६८ च्या उत्खननात पक्क्या विटांनी बांधलेल्या द्विचक्राकार स्तुपाचे अवशेष सापडले आहेत. या स्तुपाचा बाह्य व्यास २६ मिटर होता, ज्याच्या बाह्यचक्रास १६ आरे तर अंतरचक्रास ८ आरे होते. नाभिस्थानी चौरसाकृती ३४ स्तरांची वास्तू असलेला हा स्तूप विटांमध्ये बांधलेला असलेला भारतीय पातळीवर एक महत्वपूर्ण उपलब्धी होता.



**प्राचीन तेर मधील जैन धर्म :-**

तेर हे प्राचीन दक्षिणपथातील जैन धर्माचेही अग्रगण्य पीठ होते असे मानले जाते ज्याचा इतिहास इ.स.पूर्व पहिल्या शतकापर्यंत जाऊ शकतो.

जैन धर्माच्या दक्षिणपथातील धर्म प्रसाराचे श्रेय सम्राट चंद्रगुप्त मौर्य व जैनमुनी भद्रबाहू यांच्याकडे दिले जाते. इ. स.पूर्व चौथ्या शतकातील अखेरच्या पर्वात या मुनींचे कर्नाटकामधील श्रवणबेळगोळ नजीकच्या चंद्रगीरी या ठिकाणी आगमन झाले होते ही घटना आता ऐतिहासिक घटना म्हणून मान्य केले जाते. तेर हे त्याकाळी उत्तर भारताला दक्षिणेशी जोडणाऱ्या राजमार्गावरचे प्रमुख असे शहर असल्यामुळे ते तत्कालिन परिस्थितीमध्ये जैन धर्माच्या प्रथम संपर्कात आले असावे असे तज्ञांचे मत आहे.

जैन मुनी कनकामर लिखित करकण्डचरियु या १० व्या ते ११ व्या शतकामध्ये निर्मिल्या गेलेल्या ग्रंथामध्ये तेरापुर येथील विद्याधर राजांनी त्याठिकाणी जैन मंदीर निर्माण केल्याची माहिती नमूद करुन ठेवण्यात आलेली आहे. विद्याधर राजाच्या या उल्लेखासह अगदी तशीच माहिती त्याच कालावधीतील ब्रह्मकथाकोशातही लिहून ठेवलेली आढळून येते.



## तेरमध्ये असलेला शैव व वैष्णव पंथाचा प्रभावः-

प्राचीन काळापासून तेर येथे शैव पंथाचे व वैष्णव पंथाचेही अस्तित्व असल्याचे येथील एकूणच परिस्थितीवरुन दिसून येते. या ठिकाणी असलेले कालेश्वर, उत्तरेश्वर, सिध्देश्वर ही शिव मंदीरे इथल्या शैव पंथाच्या प्रभावाची साक्ष देतात.

शिवाय गावामध्ये अशाप्रकारची इतरही कांही शिवालये निर्माण झालेली आढळून येतात. तर येथील प्राचीन त्रिविक्रम मंदीर व त्यानंतरचे नृसिंह मंदीर या ठिकाणच्या वैष्णव पंथाच्या येथे असलेला ऋणानुबंध दर्शविते. तर येथे इसवी सनाच्या सुरुवातीपासून शिव उपासना असावी असे वाटते. कारण अलिकडच्या काळात उपलब्ध झालेला ब्राम्ही लिपीतील आणि प्राकृत भाषेमध्ये लिहिला गेलेला शिलालेख याकडे निर्देश करतो. यातील दान भगवान महादेवाचे नमन करुन देण्यात आल्याचे आढळते.

वीरशैव किंवा लिंगायत पंथाच्या स्थापनेतसुध्दा तेरचा सहभाग असावा असे वाटते.कारण या पंथाचे आद्य संस्थापक म. बसवेश्वर हे बिज्जल कलचुरीने अकराव्या शतकाच्या मध्यास कल्याणच्या चालुक्याचे राज्य बळकाविण्यापूर्वीच बिज्जलच्या सेवेमध्ये होता. बिज्जलाचा पितामह जोगम कलचुरीप्रमाणेच कर्नाटकातील कांही शिलालेखात बिज्जलाचा उल्लेख तारिकाडू बिज्जल असा करतो. तेंव्हा विद्वानांच्या मतानुसार तारिकाडू हे तेरचे कानडी नामकरण गृहीत धरल्यास यावरुन असे स्पष्ट होऊ शकते की, राज्य प्राप्तीच्या पूर्वी बिज्जलाचा तेरशी संपर्क असावा. शिवाय कर्नाटकातील एका कोरीव लेखात बिज्जलांनी इ.सन. ११६२ मध्ये तगरटेवर हल्ला चढवून ते ठिकाण जिंकल्याचीही माहिती नमूद आहे. बिज्जलांने याच वर्षात चालुक्याची राजधानी कल्याणवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले होते. यावरुन तगरटे म्हणजे तेर असून त्यावरील विजय कल्याणवरील स्वारीच्या संदर्भातील होता हे स्पष्टपणे कळू लागते.

या नगराच्या पूर्वीच्या परिघाचा विचार केला असता कदाचित साधारणपणे एक हेक्टर परिसरात पसरलेले पुरातत्व गर्भक्षेत्र आढळून आलेल्या आजच्या इर्ला या गावासह, कोंड येथील श्री भीमाशंकर मंदिर, तेरमधील काही मंदिराच्या बांधणी तंत्राचा उपयोग केलेले सध्या मौजे जागजी येथे स्थित, महालक्ष्मी वा महाकाली मंदिर, आणि मंदिराबाहेर, चारी बाजूंनी आत प्रवेश करता येण्यासारखे बांधकाम असणारी, व सीमाभिंतीवर निर्मिलेल्या देवकोष्टामध्ये, श्री विष्णूच्या मुर्ती असलेली एक विशेष बारव..... शिवलिंगातील साळुंकेच्या जागेतून बाजूला न वाहणारे मात्र आजपर्यंत कधीही न आटलेले, पाणी येते ते मौजे भंडारवाडी येथील सिध्देश्वराचे देऊळ..... ज्ञानदानाच्या जागेवर बेलाच्या दोन झाडांनी साधारण ६० व ९० अंशाच्या कोनात वाकून सावली धरलेल्या ऋषी अगस्ती यांचा मौजे डकवाडी येथील आश्रम..... आणि तेरणेच्या पंचक्रोशीत प्रसिध्द व तज्ञांच्या मते साधारण सतराव्या शतकातील असलेले मौजे हिंगळजवाडी येथील एका सरोवराच्या काठावर वसलेले हिंगुल अंबिका किंवा हिंगळजदेवीचे मंदीर आणि पुरातन ग्रंथ व दस्तावेजात तेरापूरच्या लेण्या म्हणून उल्लेख असलेल्या डॉ. अरुणचंद्र पाठकांच्या मते वाकाटक काळात निर्मिलेल्या उस्मानाबाद शहरानजीकच्या धाराशिव लेण्या या सर्वांचा प्राचीन तेरणेशी ऋणानुबंध जुळतो.

यामध्ये विशेष म्हणजे हिंगळजवाडीच्या शक्तीपीठावरील देवीच्या मांदीरासमोर असणारे शिवलिंग अगदी स्वत: भोवती फिरते. शिल्पकलेचा एक चांगला नमुना असणाऱ्या या शिवमंदीरासमोरील दगडी नंदीही उत्कृष्ट कोरीव काम केलेला आहे.

या शिवाय मौजे काजळा येथील श्रीसंत रामाानंद महाराजांचे पावन समाधी मंदिर.....

पूर्वाश्रमीचे कासिम चौधरी या धर्माने मुस्लिम असणाऱ्या आदरणीय काशिनाथ महाराजांनी दत्तमूर्ती स्थापित केलेले रामवाडी येथील दत्त मंदिर..... आणि वाणेवाडी येथील श्री संत गोरोबाकाकांचे पादुका मंदिर ही सर्व अर्वाचिन धार्मिक स्थळेही प्राचीन तेरच्या व्यासामध्ये समाविष्ठ होत होती असे म्हटले जाते.

पौराणिक संदर्भानुसार कृतयुगात सत्यलोकनाथाने विश्वकर्म्याच्या हस्ते निर्माण केलेले हे नगर अनेक योग्यांची तपस्थली होती. महाराष्ट्राच्या अध्यात्मिक पायाचा मूलाधार असणाऱ्या श्री संत गोरोबा काकांची जन्म, कर्म व समाधी भूमी म्हणून तेर आजही सुप्रसिध्द आहे. प्राचीन तेरणेशी ऋणानुबंध दर्शविणारे भूगर्भातील बौध्द चैत्यगृह किंवा तीर्थ कुंडासारख्या (जलकुंडासारख्या) अनेक गोष्टी या ठिकाणी उत्खननात अजनूही सापडतात...

उत्खननामध्ये सापडलेले आणि 'महाराष्ट्रराज्य पुरातत्व विभागाच्या वतीने संरक्षित स्मारक म्हणून अगदी आत्ताच सुव्यवस्थित करण्यात आलेले तेर बसस्थानकाजवळील अर्धगोलाकृती चैत्यगृह ९ मीटर लांब व ५.५ मीटर रुंदी आहे. पूर्वी त्याच्या अर्धगोलाकृती भागात सव्वा मिटर व्यासाचा स्तूप होता. या चैत्यगृहास लाकडी प्रवेशद्वार असावे असे संशोधकांचे मत आहे.

तर अशाच रितीने उपलब्ध झालेला सध्या तीर्थकुंड म्हणून प्रचलित असलेला विटांचा जलकुंड हा कांही तज्ञांच्या मते महाराष्टातील सर्वात प्राचीन जलकुंड असावा जो जल व्यवस्थापनाच्या इतिहासात महत्वपूर्ण स्थान असलेला असू शकतो. या जलकुंडाकडे पाहिल्यास त्याचा आकार ८.३० x ८.३० मीटर असून तळापासूनची त्याची उंची ही २.७० मीटर आहे. ९० सें.मी. उंचीचा एक टप्पा, असे तीन टप्प्यात हे बांधकाम पूर्ण केलेले असावे असे वाटते. या जलकुंडासाठी भाजणीच्या विटांचा वापर केला असून या विटांचा आकार ५२ x २४ x ५ सें.मी. आणि ४२ x १९ x ६ सें.मी. असा आहे. सभोवताली काळी जमीन व पाणी यांच्या दबावातून कुंडास होणारे धोके टाळण्यासाठी बांधलेल्या पायऱ्यांमध्ये विशिष्ट अंतरावर आगम व निर्गमार्ग ठेवण्यात आले आहेत ज्यामुळे कालओघात हे बांधकाम टिकुन आहे.

या कुंडाच्या लगत उत्तर भागात अश्वनालाकृती विटांच्या मांदीरांचे अवशेष उपलब्ध झाले होते. जे इ.स.च्या पहिल्या शतकातील असावेत असा अंदाज वर्तविला जातो. तेर माधील जुने वयोवृध्द या ठिकाणी दक्षिणेश्वराचे मंदीर होते असे आम्हाला सांगितले जायचे असे आजही सांगतात.



## जागजीचे महालक्ष्मी किंवा महाकाली मंदीर :-

उपरोक्त उल्लेखिलेल्या जागजीच्या महालक्ष्मी मंदिराचे ऐतिहासिक अधिष्ठान हे विशेषकरुन विचारात घेण्यासारखे आहे. हे मंदीर पश्चिमाभिमुख असून एक मिटर उंच अधिष्ठानावर उभारलेल्या या मंदीराचा गाभारा ४ x ४ चौरस मिटरचा आहे. त्यापुढे मुखमंडप उभारलेला असून गाभाऱ्याचे वैशिष्ट्य असे की, तो एकुण १६ स्तंभावर उभा आहे. यापैकी ४ स्तंभ पूर्ण आहेत. गाभाऱ्याच्या मधोमध असणाऱ्या २ x २ मिटरच्या चौथऱ्यावर ४ स्तंभ उभारलेले असून मधोमध असलेल्या अधिष्ठानावर मुख्य मूर्तीची प्रतिष्ठापना केलेली आहे.

पुढील मुखमंडप २.५० x २.५० मिटर आकाराचा असून गर्भगृहावर विटांनी बांधलेले साधारण १४ मिटर उंचीचे शिखर भूमीज पध्दतीचे आहे. या मंदिरामध्ये तेर येथील कालेश्वर, उत्तरेश्वर व त्रिविक्रम मंदिराच्याच बांधणी तंत्राचा उपयोग केल्याचे दिसते. म्हणजे या तिन्ही मंदिराच्या गर्भगृहावर वरचा मजला नाही तरीही अंतर्वक्र छप्पर बांधण्याकरिता विटांच्या झुकाव तंत्राचा म्हणजेच कार्बेलिंग पध्दतीचा उपयोग समानतेने व सर्व ठिकाणी केला आहे. शिवाय या सर्व मंदिराना विटांच्या बांधकामावर चुन्याचा गिलावा केलेला आढळतो.

या मंदिरामध्ये असणारी गंडकी शिळेची (ब्लॅक बसाल्ट) महालक्ष्मी अथवा महाकालीची मुर्ती चतुर्भुज (चार हात) असून ती पद्मासनात विराजमान आहे. कांही तज्ञ मात्र तिचे पद्मासनात नव्हे तर सव्यललितासनात ती पद्मपीठावर बसलेली आहे असे विश्लेषण करतात. या मूर्तीच्या हातात दक्षिणाकार क्रमाने खड्ग (तलवार) डमरु, त्रिशूल व पानपत्र धारण केलेले आहे. पानपत्र असलेल्या हाती नरमुंड असून मुर्तीच्या उजव्या बाजूस असूराचे (राक्षसाचे) शिर तर डाव्या मांडीखाली एडक्याचे शिर (मस्तक) दाखवलेले आहे. वस्त्रालंकारयुक्त असलेली ही मुर्ती नरमुंडाला धारण केलेली असून तिच्या भालप्रदेशावरही ठळकपणे नरमुंडपट (नरमुंडाची माला) दाखविला गेला आहे. करकंडमुकुट असणाऱ्या या मूर्तीचा रेखिवपणा लक्षनीय असून मुकुटामध्ये किर्तीमुख दाखविले गेलेले आहेत. चंडीकाकल्पातील महालक्ष्मीचे एक ध्यान येथील मूर्तीशिल्पाला लागू पडते.

या स्थानदेवतेचा संबंध कोल्हापूरच्या महालक्ष्मीशीही जोडला जातो. मात्र या मंदिरात परंपरेने म्हटल्या जाणाऱ्या आरतीमध्ये जागासूर मर्दूनी ग्राम जागजाई झाला अशी नोंद आहे. अशा प्रकारचे हे मंदीर कांही तज्ञांच्या माते प्राचीन तेरच्या सीमारेषेतले आज तेरच्या जवळ शिवाय तेर मधील कांही मंदिराच्या बांधकाम तंत्राशी साधर्म्य असणारे आहे. हे मंदीर १२ व्या शतकातील असावे असे कांही संशोधक मानतात.



शिवाय उपरोक्त उल्लेखानुसार या मंदिरासमोर असणारी बारव अत्यंत मनमोहक असून तिला चारी बाजूंनी आत उतरण्यासाठी प्रवेश तयार केलेले आहेत. बारवेच्या सीमा भिंतीवर २४ देवकोष्ठांची निर्मिती केलेली असून त्यामध्ये बहुतांशी विष्णूमूर्ती ठेवण्यात आलेल्या आहेत. महालक्ष्मी मंदिरावर भूमीज शिखर असले तरी बारवेतील देवकोष्टांवर भूमीज व वेसर शिखर आहे.

अशा प्रकारचे हे मंदीर व बारव या परिसराच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी आजही दिमाखात उभा आहे जे पूर्वी तगर शहराच्या सीमारेषेत येत होते असे म्हटले जाते.

या ऐतिहासिक व पुरातन धार्मिक पार्श्वभूमीमुळेच तेरचे महत्व अबाधित असल्याची साक्ष इथल्या मंदिरासह तेरणेच्या पंचक्रोशीतील ध्यानस्थ योग्यासमान स्थितप्रज्ञाच्या तटस्थ भूमिकेत उभा राहून, कालओघात पारंब्याचेसुध्दा वृक्षात रुपांतरण झालेले वटवृक्षही आजपर्यंत देत आले आहेत. विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रतिवर्षी उर्स महोत्सव होणाऱ्या इथल्या दर्ग्यातील हजरत ख्वाजा सुलेमान रहेमतुल्ला अलैही यांच्या माध्यमातून त्या अल्लाह समोर केल्या जाणाऱ्या सजदयापासून ते अलिकडल्या 'कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी' हा भक्तीचा कर्मसिध्दांत मांडणाऱ्या श्री संत सावता माळी मंदिरातल्या नमस्कारापर्यंतची धर्मसहिष्णुता इथे अनायास नांदते आहे. इतकेच नव्हे तर तेरच्या एकूणच तत्वप्रणालीतील रचनेचा विचार करता हरि आणि हर यामध्ये कोणताच भेद नाही असा संदेश देणाऱ्या अगदी आत्ताच्या काशी विश्वेश्वर व राधा-कृष्ण मंदिरातील विनम्रतेच्या पाठीमागे पंथभेदाची वैचारिकता सहजगत्या संपल्याचे चित्र केवळ याच मातीत पहावयास मिळते.....



माग ग्रामात महत्व असणाऱ्या बिरोबा व खंडोबा या सारख्या ग्रामदैवतांचीही येथे पूजा होते आणि गावातल्या शक्तीदेवतांची मंदिरेही इथल्या भाविकांसाठी श्रध्दास्थाने बनतात. यामध्ये विशेष उल्लेख करावयाचा झाल्यास अपभ्रंशाने सातलक्ष्मी म्हणून प्रचलित असणारी देवी शांत लक्ष्मी,

देवी यल्लम्मा ,जगदंबा तुकाई... आई गोदावरी... माय रेणुकाई... आदिशक्ती येडेश्वरी... आणि योगेश्वरी माऊली अंबिका किंवा कोष्ट अंबिका या काही मंदिराचा करावा लागेल. त्याचबरोबर पद्मपुराणात 'अ' लक्ष्मी असा उल्लेख होणाऱ्या लक्ष्मीनारायणाचेही येथे मंदिर आहे... ज्यामध्ये संपन्नतेची देवता नारायणी लक्ष्मीची मूर्ती अष्टभूजा असून तिच्या पोटात विंचवाचे चित्र रेखाटल्याचे दिसते.....

* * * * *

गाव म्हटले की बजरंगबली श्री हनुमानजी आलेच. तेरमध्येही आठवडी बाजार मैदानात श्री शनैश्वराच्या मंदिराशेजारी एक..... गावच्या पूर्व दिशेस एक..... व मुख्य वेशीत एक अशी पवनकुमार असणाऱ्या या अंजनीपुत्र रामदूताची तीन जुनाट मंदीरे आहेत शिवाय गावात गोदावरी, पेठ व सत्यपुरी नगर अशा इतरही अनेक भागात महावीर हनुमानजींची मंदिरे उभा राहिली आहेत..... याचबरोबर तेरमध्ये मंगलमूर्ती श्री गणेशाची दोन पूर्वाभिमुख व एक उत्तराभिमुख अशी तीन स्वतंत्र मंदीरे आहेत. ज्यामध्ये सौंदयपूर्ण अशी कलाकुसर केलेल्या विघ्नहर्त्या श्री गजाननाच्या मूर्ती विराजमान आहेत..... आणि पदचिन्ह स्थापिलेली दत्तोबा या नावाने प्रचलित अशी दत्तात्रयाची समाधीही या ठिकाणी आपणाला पहावयास मिळते.....

# तेर मधील कांही शिवमंदीरे :-

तेरचे खऱ्या अर्थाने उल्लेखनीय वैशिष्टय म्हणजे या ठिकाणी असणारी जवळपास सर्व मंदीरातील शिवलिंगाची प्रतिस्थापना आणि स्वतंत्र स्वरुपातील शिवमंदीरे... पतितांना पावन करणारे हे एक पुरातन शिवपीठ असावे असे वाटण्याइतपत शिवपिंडी व शिवमंदीरे तेरणेच्या कुशीत शैवांसह वैष्णवांचेही श्रध्दास्थान म्हणून अस्तित्वात आहेत...


यामध्ये कनकेश्वर अथवा कनकाई, पद्मेश्वर किंवा पद्मावती, ढवळेश्वर... मल्लिकार्जून... रक्तेश्वर... अमृतेश्वर अशा अनेक मंदिरातून हा चंद्रमौळी शिव, उमापती देवाधीदेव महादेव, सर्वांना दर्शन देण्यासाठी वाट पाहतो आहे.



इतकेच नव्हे तर
तेरणेच्या पात्रातले रेखीव
दगडांनी बांधलेले अवशेष
स्वरुपातील व इतिहास
तज्ञांच्या मते मध्ययुगीन
चालुक्य शैलीतील
वाळेश्वर, वाळकेश्वर किंवा
त्रिपुरांतकेश्वराचे मंदीर.....
गर्भगृहाच्या बांधकामाचे
वेगळेपण असल्याने
गाईलेल्या स्वरातून घुमणारा
ध्वनी निर्माण होणारे व
अखंड शिळेतून शिवपिंड
कोरलेले चंद्रेश्वराचे
मंदीर.....



गावामध्ये सर्वात उंचठिकाणी असलेले बऱ्यापैकी उत्तुंग शिखर व त्यावर कळस दिसणारे तुंगेश्वर किंवा शिखरेश्वर महादेव मंदिर..... सुरेख दगडी रेखीव कलाकुसर केलेल्या सभामंडपासह तितकीच सुंदर मोठी भव्य-दिव्य शिवपिंड ज्यावर उत्तरायणातील काही दिवस सूर्यकिरण पडतात ते समोर पश्चिमाभिमुख गणपती व आजपर्यंत कधीही पाणी न आटलेला आड असणारे प्राचीन सिध्देश्वर मंदीर ..... अशी अनेक मंदिरे पर्यटकांसाठी आकर्षणाची केंद्र बनून राहिली आहेत...यापैकी सिध्देश्वर मंदीराची साधारणपणे १६ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात एकवेळा दुरुस्ती झाल्याचेही इतिहास संशोधक स्पष्ट करतात.



## सद्‌गुरु जंगलेश्वर महाराज मंदीर :-

खास तेरची म्हणून कांही मंदिरे इथल्या शाश्वत सौंदर्यात भर टाकत आहेत, ज्यांचे दर्शन हा सुखद व मंगलमय अनुभव असतो. त्यापैकी एक, पूर्व आणि उत्तर अशा दोन दिशांना प्रवेशद्वार असणारे श्री सदगुरु जंगलेश्वर महाराजाचे मंदीर होय... लाकडी खांबांनी उभारलेला सभा मंडप व जुन्या माळवदाच्या स्वरुपातील छताचा वापर करुन उभारण्यात आलेले हे मंदीर अतिशय नयनरम्य व शांत जाणवते...

या भूमीवर श्री जंगलेश्वर महाराजांचे १२ वर्षांहून अधिक काल वास्तव्य होते असे म्हटले जाते... मंदिराच्या बाहेर एक जुनी विहीर असून शिखराच्या पूर्व बाजूस सत्यपुरी हनुमानच्या खाली असलेल्या खोलीमध्ये महाराजांची गादी जतन करुन ठेवण्यात आली आहे... तर मंदिराच्या उत्तर बाजूस कमीत कमी पारंब्याचे व अधिक न वाढणारे वडाचे झाड आहे.

याबाबत अशी आख्यायिका सांगतात की हा वटवृक्ष पारंब्यानी जागा व्यापू लागला तेव्हा जंगलेश्वर महाराज त्यास म्हणाले, एवढे जास्त वाढून आपण आम्हाला जागा ठेवणार आहात की नाही? थांबा आता! आणि ते झाड चक्क थांबले, नव्हे तर तेव्हांची ती आज्ञा त्या झाडाने व्रत म्हणून आजपर्यंत पाळली आहे..... हे आहे या मंदीराचे गर्भगृह..... येथे महाराजांची प्रतिमा व पादूका ठेवण्यात आल्या आहेत..... वैशाख शुध्द चतुर्थी सन १३१० फसलीस या महान सद्‌गुरुने याच ठिकाणी आपला देह समर्पित केला असे मानले जाते.......



## राम मंदीर :-

पौराणिक संदर्भानुसार त्रेतायुगात शांतापुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या नगरीत वनवासामध्ये फिरताना श्रीराम लक्ष्मणजी आल्याची नोंद तर आहेच शिवाय आजच्या तेरमध्ये ब्रम्हस्वरुप प्रभूरामचंद्राची तीन मंदीरे आपणास पहावयास मिळतील...

त्यातील पूर्वाभिमुख असणाऱ्या या जेष्ठ मंदिरात कृपासिंधू श्रीरामजी, आदर्श बंधू श्री लक्ष्मणजी , चैतन्यस्वरुप पातिव्रत्य देवी श्री सीताजी व भक्तीचे मूर्तीमंत प्रतिक असणारे श्री हनुमानजी यांच्या सुरेख मुर्ती आहेत..... समोर इंद्रेश्वर महादेव विराजमान आहेत..... श्रीराम जानकीच्या या दरबारातही अनेक नागरिक श्रध्दापूर्वक आपली हजेरी लावतात.......

## कै. रामलिंगअप्पा लामतुरे पुराणवस्तु संग्रहालय :-

तेरचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय म्हणजे येथील पुराणवस्तू संग्रहालय..... या ठिकाणचे रहिवाशी असणाऱ्या कै. रामलिंगाप्पा लामतुरे यांच्या छंदातून एकत्रित झालेल्या २२,८९२ जुन्या वस्तूंचा संग्रह कांहीही मोबदला न घेता त्यांनी महाराष्ट्र शासनास २२ जानेवारी १९७१ रोजी देऊन टाकला, त्यातून हे पुराणवस्तू संग्रहालय त्यांच्याच नावाने उभा रहिले. ज्यात तेरमध्ये सापडलेल्या अनेक वस्तू जतन करुन ठेवल्या आहेत.....

यामध्ये सातवाहनकालीन नाणी... मातीच्या मूर्ती... हस्तिदंताच्या वस्तू... शंखापासून बनविलेल्या वस्तू... दगड व मातीचे विविध आकाराचे मणी... अलंकार व त्यांचे साचे... मृण्मयपात्रे... कर्णभूषणे... बौध्द स्तुपाचे अवशेष... चुना घाण्याची दगडी चाके... कांही शिलालेख... भाजलेली माती व पाषाणापासून निर्मित गणेश मूर्ती... देवतांचे टाक किंवा प्रतिमा... गळ्यात परिधान करावयाचे ताईत... सातवाहनकालीन नक्षीदार मातीची भांडी... व रा. चिं. ढेरे यांच्या शब्दात सृजनतेचे प्रतिक असणाऱ्या लज्जागौरी... इत्यादींचा समावेश आहे.

याचबरोबर बऱ्यापैकी वजनदार असूनही पाण्यावर तरंगणारी वीट..... एका बाजूस गजाननाचे तर दुसऱ्या बाजूस सरस्वतीचे चित्र रेखाटलेली सुरेख दौत..... पुष्पाकृती कोरलेली सातवाहनकालीन तांबडया मातीची वजनाने हलकी अशी वाटोळी किंवा लंबवर्तुळाकार कर्णभूषणे..... रोमन राजाची प्रतिकृती असणारी मातीची पदके, कांही दगडी पदके .....



कमलपुष्पाची नक्षी बुडावर असणाऱ्या मेगॅरियन पध्दतीच्या मातीच्या भांडयाचे किमान १५-२० प्रकार..... व नक्षी काढावयाचे साचेही येथे पहावयास मिळतात... याशिवाय येथे आभूषणासह, चेहरा व केसांची वेगवेगळी रचना असणाऱ्या बोलक्या डोळयांच्या मस्तकाकृती..... व श्री गणेशाच्या अनेक सुंदर मूर्ती ठेवण्यात आलेल्या आहेत.....

१३ व्या शतकातले शिवपार्वती..... १२ व्या किंवा १३ व्या शतकातले भगवान विष्णु..... उमा महेश्वर..... भैरव..... आणि १३ व्या शतकातले भैरवी..... ब्रम्हा..... व वामन..... ही लक्षवेधक दगडी शिल्पेही डोळयांना मोहिनी घालतात.

त्याचबरोबर या ठिकाणी ठेवलेल्या कांही शिल्पाकृतीचा खास उल्लेख करावा लागतो, त्यामध्ये डाव्या हातात पोपट व अलंकार परिधान केलेली स्त्रीमूर्ती. या मुर्तीच्या गळयातील कांहीशा वेगळया अशा माळा मणी किंवा मोती एकमेकास घासू नये म्हणून पूर्वीच्या पध्दतीनुसार फलकातून ओवलेल्या दिसतात. कौटील्याच्या अर्थशास्त्रातला फलकहार तो हाच.....



रोमन दिव्यासारखेच आकाराने गोल, वातीसाठी तोटी व लहान मुलांना दूध पाजावयाच्या बोंडलीसारखे तेर निर्मित दिवेही येथे ठेवलेले आहेत.....

. शिवाय त्रिविक्रम मंदिरामध्ये भग्नावस्थेत पडलेली, इतिहासकारांच्या मते राष्ट्रकूटकालीन असणारी हातात ढाल खड्ग तलवार असणारी कार्तिकेयाची मोरावर आरुढ, चतुर्भुज मुर्तीही याच ठिकाणी आणून ठेवली आहे.....





समईच्या पंचपाळयासारखी रचना असणारा एक खास दिवाही येथे आहे... या दिव्याच्या अग्रभागी असणाऱ्या चंबूसारख्या लहान भांडयात ओतलेले तेल पंचाळयाच्या मागील छिद्रातून पाळयात उतरते व त्यामुळे दिव्याची वात जळत राहाते.....

तसेच केस मोकळे सोडून चितेकडे जाणारी स्त्री कैलासाला पोहोचल्याचे रेखाटन व खांद्यापासूनचा हात दाखवलेली सतिशीळा..... युध्दाचा प्रसंग व मोक्षप्राप्ती असा शिल्पपट रेखाटून देशासाठी बलिदान दिलेल्यांच्या सन्मानार्थ निर्मिलेले विरगळ..... सातवाहन काळातील मानला जाणारा व बनवताना वाळूचे अधिक प्रमाण असलेला भल्यामोठया तोंडाचा व लाल खापराचा रांजण..... भाजलेल्या मातीचे वर सिंहाच्या पायाखाली हरीण दाखविलेले आकर्षक असे बरणीचे झाकण..... जवळपास दीड फूट उंचीचे, भाजलेल्या मातीपासून बनवलेले धान्य मोजण्याचे माप..... व सातवाहन काळातील वेगवेगळ्या पाच प्रकारची जाती जी हल्लीच्या जात्यांपेक्षा भिन्न वाटतात ती सुध्दा येथे ठेवण्यात आली आहेत. तसेच सहा ते सात इंच लांब व दोन ते तीन इंच रुंद वजनदार अशी दगडी कोयरीही आपण येथे पाहू शकता. दोन कप्प्याची व हुबेहूब आंब्याच्या कैरीसारखी दिसणारी ही कोयरी ग्रामदेवतेसमोर कुंकू ठेवण्यासाठी वापरत असावेत.....

मायलेकरांच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून बाळाच्या गळयात बांधला जाणारा कासवाकृती ताईत, चांदी व सुवर्णाची नाणी, शाडूपासून बनविलेले स्त्रीमूर्ती व हस्तिदंती बाहुली ..... देठाकडे लहान व पुढे जाईल तसे मोठे होत जाणाऱ्या हुबेहुब सिताफळाच्या आकृतीची अत्तर्दाणी अथवाअत्तराची कुपी ..... आणि युध्दातील विविध शस्त्रांसह सज्ज असणारा, चिलखत घातलेल्या हत्तीवरील आरुढ योध्दा अशा काही वस्तुसुध्दा आपण तेरमधील लामतुरे परिवाराच्या खाजगी संग्रहामध्ये पाहू शकता...

त्याचबरोबर बांगडया भरलेल्या हातात राजदंड घेतलेल्या व थोडी निराळी वेशभूषा असलेल्या स्त्रीचे अंदाजे ४ थ्या शतकातील शिल्पचित्र पाहिल्यास कलेच्या अतिउच्च प्रतीची साक्ष मिळते..... सरळ नाकाच्या या स्त्रीचा केशसंभार डोक्यावर अर्धवर्तूळाकृती मोरपिसासारखा वाटतो..... अलंकार कमी असूनही चेहऱ्यावरील स्मित लक्षणीय आणि इतर चित्रांच्या तुलनेत येथे शैलीचा फरक स्पष्ट जाणवणारे हे शिल्प आकर्षक, मोहक या शब्दांच्या पलिकडले आहे..... याच ठिकाणी जनावराच्या हाडावर कोरलेली एक स्त्रीमुर्तीही आहे. फासळीच्या अंतर्भागावर कोरलेल्या या मूर्तीच्या चेह-यांची ठेवण टिपिकल चौकोनी असून हातात कंकण... पायात लट्ठ तोडे व कानांमध्ये समकालीन शिल्पात आढळणारी जाडजूड कर्णफुले आहेत... मागील बाजूस कोरीव काम नसलेल्या या हाडाच्या मूर्तीवर कांही विशेष प्रक्रिया केल्यामुळे दोन हजार वर्षात वातावरणाचा कसलाच परिणाम दिसत नाही.....

पण याहीपेक्षा सुंदर असणारी पाच इंच उंचीची हस्तिदंती बाहुली ही इटालीत पॉम्पी येथे १९३७-३८ मध्ये सापडलेल्या लक्ष्मीच्या व अफगाणिस्तानात बेग्राम कपिशा येथे सापडलेल्या भारतीय बनावटीच्या मूर्तीची आठवण करुन देते..... ठसठशीत चेहरा... कमरेचे पारदर्शक वस्त्र... कपाळावर बिंदी... केशसंभार सांभाळण्यासाठी पट्टा...



धम्मिल पध्दतीचा अंबाडा... कानात कुंडले... गळयात हार... हातात कडी... कमरेला मेखला... व इतर मूर्तीत न दिसणारे घारे डोळे असणारी ही 'स्त्री' डाव्या हाताने वस्त्र सावरताना उजव्या हाताने आपल्या कर्णफुलांना स्पर्श करीत आहे..... वेणीचे तीन पेडही स्पष्ट दिसणारी ही बाहुली म्हणजे सातवाहन काळातील हस्तिदंती कोरीव कामाचा सर्वोकृष्ट नमुना असल्याचे संशोधकांचे मत आहे..... या बाहुलीच्या मांडयावर, बरेच खोल जाणा-या छिद्रावरुन तिचा उपयोग आरशाच्या मुठीसारखा होत असावा.....





पूर्वी त्रिविक्रिम मंदिरात असणाऱ्या या भगवान श्री विष्णूच्या मूर्तीस पाहताना कलाप्रेमी अगदी भान विसरुन जातात... शासकीय संग्रहालयातील या मूर्तीस असणाऱ्या मुकुटामधील कालकुसर... गळयातील अलंकार... ते अगदी बाजूबंद व कमरेच्या वस्त्रापर्यंत केलेले दगडावरील काम एखाद्या नामवंत चित्रकाराने कागदावर रेखाटलेल्या चित्रापेक्षाही उत्तम जाणवते.....

संग्रहालयातली ही आहे उत्तरेश्वर मंदिराची लाकडी चौकट..... ही चौकट उत्कृष्ट कोरीव काम केलेली असून कोणत्याही दगडी प्रवेशद्वारावरील शिल्प व नक्षीपेक्षा अधिक उठावदार व लालित्यपूर्ण वाटते..... उत्तरेश्वराच्या लाकडी द्वारशाखांवर वेलबुट्टी, हंस, मिथुने, भौमितीक नक्षी व व्यालांची रांग कोरलेली आहे..... दाराच्या माथ्याचा भाग सौंदर्यपूर्ण कोरीव कामामुळे अप्रतिम झाला आहे..... त्याखाली अलंकार व केशरचनेसह कोरलेल्या अवकाशात विहार करणाऱ्या दम्पती मधील स्त्री पुरुष ओळीने एकाआड एक येतील अशी योजना केलेली दिसते..... शिवाय विविध देवतांच्या मूर्ती... नर्तकी... चामरधारिणी... योगी... व आदरांजली वाहणारे भक्तही कोरलेले असून उभे पुरुष... सनईवादक... आणि दोन्ही बाजूस चामरधर असताना कमलासनावर पद्मासनात बसलेली, मस्तकावर नागफणे असलेल्या देवतेची चतुर्भुज मूर्तीही येथे दिसते.....



शिवाय यज्ञोपवितासह आसनस्थ ब्रम्हदेव... ब्रम्हा विष्णू महेश... व सूर्याच्या छटा जाणवणारी कमलपुष्प, नाग व शंखधारी त्रिमूर्तीही येथे रेखाटलेली दिसते... तर आतील चौकटीवर उभ्या शंकरपाळया व फुलांच्या नक्षीस चैत्यगवाक्ष दाखविलेले आहेत..... हेन्‌री कझिन्सच्या मते या चौकटीवरील नक्षीकाम हे चालुक्य शैलीतले आहे मात्र इतर संशोधकांनी याबाबत वेगळी मते नोंदविली आहेत.



# श्री उत्तरेश्वर मंदीर :-

वास्तुशास्त्राच्या दृष्टीने कलात्मक मंदीर निर्मितीचा एकसंघ स्वरुपातील अप्रतिम नमुना असलेले हे उत्तरेश्वर मंदिर आता आपण पाहूया..... दगडांचा अजिबात वापर न केलेल्या या मंदिराच्या स्थापतींना द्रविड कलाशैलीची चांगली माहिती असावी असे या पूर्वाभिमुख मंदिराकडे पाहिल्यास वाटते..... वजनाने हलक्या असणा-या उत्कृष्ट भाजणीच्या अलंकृत विटांचा  उपयोग या मंदिराच्या बांधकामासाठी केला असून याची उभारणी करताना साधारणपणे १ पूर्णांक ६५ मीटरचे अधिष्ठान व त्यावर दोन मिटरचा जंघाभाग असलेले गर्भगृह आणि त्यावर द्रविडीयन शैलीतील तीन मिटर उंचीचे शिखर उभारण्यात आले होते..... कार्बेलिंग पध्दतीचा उपयोग केलेल्या या मंदिराचे हे कूट शिखर व त्यावरील विमानाकृतीभाग तीन प्रधान टप्प्यात पूर्ण केला होता.....या मंदिराचा सभामंडप पूर्वी ५.८० x ५.८० मीटर आकाराचा होता ज्यावर लाकडी सभामंडप असावा असे लाकडी स्तंभांच्या उभारणीसाठी उपलब्ध झालेल्या तळखान्यावरुन वाटते. सभामंडपामध्ये विटांची फरशी असावी आणि त्याच्या उत्तर व दक्षिण भिंतीस प्रत्येकी दोन उपगृहे असली पाहिजेत असे संशोधकांचे मत आहे.



मंदिराच्या गर्भगृहातील अभिषेक जल बाहेर आल्यावर ते साठविण्यासाठी विटांचे कुंड बांधले होते. मंदीरासाठी वापरलेल्या विटांचा अकार १६ x १९ x ५ सें.मी. असा आहे.  या मंदिरात अशा प्रकारची काळया पाषणापासून निर्मित शिवपिंड आहे..... पाठीमागे सूर्यनारायणाची मूर्ती आहे.....        तज्ञांच्या मते हे मंदीर कलचुरी कालखंडातील असावे. या मंदिराचे वास्तू घटक, शिल्पकाम व लाकडी चौकट यावरुन डॉ. अ. प्र. जामखेडकर याचा काळ इ.स. ५५० असा ठरवितात.




कांही संशोधकांच्या मते हे मंदिर ६ व्या ते ८ व्या शतकापर्यंत झाले असावे असे आहे तर डॉ.अरुणचंद्र पाठक या मंदिरास साधारणपणे ८ व्या शतकातील असल्याचे मानतात आणि डग्लस बॅरेट यास ९ व्या शतकातील मानतात....१३ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये या मंदिराच्या परिसराचा विकास करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते.तेंव्हा मंदिराच्यापुढे एक दगडी मंडप उभारण्यात आला असावा असे वाटते. या मंदिरावर कांही आक्रमणेही झाल्याचा अंदाज या मंदिरालगत असणाऱ्या विसगळ शिल्पावरुन व्यक्त करण्यात येतो.

## भगवान महावीर मंदीर :-

याठिकाणाहून आपण गावच्या पश्चिमेस असलेल्या जैनधर्मियांच्या एका पावन अतिशय क्षेत्राच्या ठिकाणी जात आहोत... येथे सभोवती दगडी परीकोट भिंत व विटांनी बांधलेले मूलनायक भगवान महावीरांचे सुंदर मंदिर, गर्भगृह व सभामंडप अशा रचनेत स्थित आहे..... तेर हे जैन धर्माचे देखिल प्रचीन दक्षिणपथातील एक अग्रगण्य पीठ होते ज्याचा इतिहास इ. स.पूर्व पहिल्या शतकापर्यंत जोडला जाऊ शकतो. १० व्या ११ व्या शतकातील करकण्डचरियु या ग्रंथात तेरापूर येथील विद्याधर राजाने तेथे जैन मंदिर निर्माण केल्याची माहिती नमूद करुन ठेवली असल्याचे आपण पूर्वी पाहिलेच आहे पण त्याच बरोबर तेर हे श्री १००८ भगवान महावीरांचे समवशरण आलेले दक्षिण भारतातले एकमेव पावन क्षेत्र आहे असे मानले जाते.

तेरच्या या जैन बसदीचे बांधकाम शके १३१३ मध्ये व जीर्णोध्दार १५२० मध्ये केल्याची माहिती येथील दोन शिलालेखावरुन मिळाल्याचे इतिहासकार सांगातात. या मंदिराच्या वास्तूघटकांच्या अभ्यासावरुन डॉ. श.भा.देव या मंदिरास इसवीसनाच्या २ ऱ्या ते ३ ऱ्या शतकातील असल्याचे मानतात.



या मंदिरात सुंदर अशी पाषाणाची, पद्मासनात विराजमान असलेली भगवान महावीरांची साडेपाच फूट उंचीची पूर्वाभिमुख मूर्ती आहे..... निजामशाहीत व तत्पूर्वीच्या परकीय आक्रमणात या मंदिरातील कांही मूर्ती खंडित झाल्या पण हे मूर्तिभंजक भगवान महावीरांच्या या मूर्तीपर्यंत येताच त्यांच्यावर मृत्यू ओढवला व ही मूर्ती सुखरुप राहिल्याची आख्यायिका येथे प्रचलित आहे...


या मुर्तींच्या पाठीमागे आदिनाथ भगवान व पार्श्वनाथ भगवान प्रतिष्ठापित असून गाभा-याच्या प्रवेशद्वाराशेजारी दोन्ही बाजूस पार्श्वनाथ भगवंताच्या मूर्ती आहेत... मंदिराच्या बाहेरील दरवाज्यास समोरासमोर श्री पार्श्वनाथ व श्री शांतीनाथ भगवान तर त्याही बाहेर एका बाजूस पद्मावती माता व दुसऱ्या बाजूस क्षेत्रपाल भगवान वास करीत आहेत... मुख्य मंदिराशेजारी श्री १००८ पार्श्वनाथ स्वामी मंदिरात पार्श्वनाथांची उभा राहिलेली मूर्ती आहे..... आणि शेजारच्या समवशरण मंदिरामध्ये १० तीर्थकरांच्या मूर्तीसह २४तीर्थंकराच्या चरणपादुका स्थापित आहेत.....

मंदिराच्या बाहेर श्री आर्यनंदीमहाराज... श्री शांतीसागर महाराज यांचे चरणपादुका मंदिर आणि श्री १००८ सहस्त्र फना सूपार्श्वनाथ भगवान मंदिरही आहे... शेजारी जुनी विहीर असून पूर्वी पुजेची भांडी रात्री कागदावर लिहून चिठ्ठी पाण्यामध्ये सोडल्यास सकाळी ती मिळत अशी अख्यायिका इथे सांगतात... या ठिकाणी प्रतिवर्षी माघ शु. ५ म्हणजेच वसंत पंचमीस यात्रा भरते ज्याकरिता विविध ठिकाणाहून जैन श्रावक तेरमध्ये येतात.......

# भगवान श्री नृसिंह मंदीर :-

तेरच्या आग्नेय दिशेस ,तेरणा व पिच्यलिका  म्हणजेच पिप्पलजा किंवा पिल्लोळा नदीच्या प्रवाहाजवळ विट व दगडी बांधणीचे परीकोट असणारे एक सुंदर जुने मंदिर म्हणजे हे नृसिंह मंदिर होय..... भव्य प्रवेशद्वार, मात्र प्रत्यक्ष मंदिरद्वार अतिशय लहान असणा-या या मंदिराचा दगडी चौक शिल्पयुक्त असून परिक्रमा मार्गावर दगडी फरशी आहे... नृसिंह या शब्दानिशी आपणास आठवणाऱ्या हिरण्यकश्यपू व प्रल्हादाच्या कथेचा येथे दुरान्वयेही संबध नाही हे विशेष ! एकदा शिव पावर्तामध्ये कलह होऊन दोघेही दूर गेले. राग ओसरल्यावर पार्वतीला पश्चाताप झाला व तिने शंकराची आराधना केली तेव्हा भगवान श्री नृसिंहाने या ठिकाणी दोघांची भेट घडवून आणली अशी आख्यायिका इथे प्रचलित असून मंदिराच्या उत्तरेस प्रदक्षिणा मार्गावर असलेले शिवलिंग या घटनेचे स्मारक समजले जाते... वयाने जेष्ठ असणारी मंडळी याचा तेरणा पिप्पलजा संगमावरील असल्याने पिप्पलेश्वर असा नामोल्लेख करतात...  मंदिराच्या दगडी मंडपासमोर तुळशी वृंदावनात हनुमंताची प्रतिष्ठापना आहे, जी नंतरच्या काळातली असावी...

या मंदिराचे शिखरही वेगळयाच पध्दतीचे आहे. मुख्य शिखराच्या बाजूस चार उपशिखरे आहेत..... मंदिराचा मुख्य गाभारा चांगला प्रशस्त व घुमटाकार असून त्यात कांहीशी स्तुपाची रचना आढळते..... येथेच मध्यभागी दगडी सिंहासनावर भगवान श्री नृसिंहाची सुपारे पाच फुट उंचीची चौरसानस्थ पाषाण मूर्ती असून समोर आडव्या दांडीवर कायमचा नंदादीप अखंड तेवत असतो.....





या मूर्तीच्या पोटानजीकच्या डाव्या बाजूचा भाग अस्तित्वात नाही. याची अशी कथा सांगतात की एकदा मध्यान्ह काळीचा नैवैद्य आणण्यास पुजाऱ्याला थोडा विलंब झाल्यामुळे क्रोधित नृसिंहाने स्वत:च्या पोटाचाच भाग काढला....... याबाबत पद्मपुराणातील कथेचा संदर्भ देत एक अशीही आख्यायिका सांगितली जाते की, एकदा दैत्यानी पार्वतीचे अपहरण केले तेव्हा श्री शंकराने भगवान विष्णूची स्तुती करुन पार्वतीविषयी विचारले. त्यावेळी विष्णुंनी शिवास तुझे मुख असलेल्या दिशेस, तुझ्या मस्तकावर उमटलेल्या चिन्हाच्या रुपात असूरांनी तिला नेल्याचे सांगितले. शंकराने ते पाहताच त्यास मेंढीचे खूर दिसले. मग शिवाच्या प्रार्थनेवरुन विष्णूने नृसिंह रुपात दैत्यांच्या कळपातल्या मेंढया पार्वतीसह गिळकृंत केल्या व शंकरास पार्वती देण्यासाठी पोटाचा तो भागच काढून दिला. त्यामुळे त्रिविक्रम मंदिरातील अपवाद म्हणून पूर्वेकडे म्हणजेच नृसिंह मंदिराकडे मुख असलेल्या मेंढेश्वरावर मेंढीचे खूर आहेत असे म्हणतात.

## श्री त्रिविक्रम मंदीर :-

या मंदिराइतकेच शिल्प व सौंदर्याचे अप्रतिम मूर्त स्वरुप म्हणजे पूर्णपणे विटांनीच बांधलेले हे प्राचिन त्रिविक्रम मंदिर..... कदाचित महाराष्ट्रातील सर्वाधिक पुरातन असणा-या या मंदिराची रचना पाहिल्यास पूर्वी ते चैत्यगृह असावे व नंतरच्या काळात समोर लाकडी सभामंडप उभारुन त्याचे मंदिरात रुपांतरण झाले असावे असे कांही संशोधक मानतात तर कांही इतिहासतज्ञ हे पल्लव शैलीतील हिंदू मंदिरच असल्याचे स्पष्ट करतात..... छताच्या मध्यभागी देखणे पुष्पवर्तुळ कोरलेल्या या मंडपात संत नामदेवांनी कीर्तन केल्याची कथा प्रचलित आहे. त्यामुळे कीर्तनसेवेमध्ये या ठिकाणी वक्त्याच्या पायाखाली परंपरेनुसार कांहीही अंथरले जात नाही..... या मंदिराच्या निर्मिती कालाखंडाबाबतही मतभिन्नता आढळते. कांही संशोधकांच्या मते गुप्त चालुक्य कालखंडात या मंदिराची निर्मिती झाली असावी तर हेन्री कझिन्स यांच्या मते ४ थ्या, पर्शी ब्राऊन यांच्या मते ५ व्या व डॉ. म. श्री. माटे यांच्या मते ते ७ व्या शतकातली निर्मिती आहे.....राज्य पुरातत्व विभागाने मात्र हे मंदीर ४ थ्या शतकातील असल्याचेच नमूद केले आहे.



हे मंदीर पूर्वाभिमुख असून सुमारे आठ मीटर लांब व ४ मीटर रुंद असणारे, विटांचे मातीत बांधकाम केलेले गर्भगृह आणि ७७ चौरस मिटर आकाराचा व सव्वाचार मीटर उंचीचा, वीट व लाकडी स्तंभानी बांधलेला सभामंडप अशी याची रचना आहे.या बांधकामासाठी वापरलेल्या विटांचा आकार ४३ x २३ x ७.५ सें.मी. असा असून विटांमधील बांधकामावर चुन्याचा गिलावा करण्यात आला आहे. गर्भगृहाचा पृष्ठभाग अर्धवर्तुळाकृती तर छत गजपृष्ठाकृती म्हणजे हत्तीच्या पाठीच्या आकाराचे असून या छताची बांधणी करताना विटांची बैठक प्रत्येक  थरात कांहीशी आत सरकणारी कारबेलिंग पध्दतीची आहे.....

कौशल्यपूर्ण व कलात्मक अशा गर्भगृहाच्या भिंतीची जाडी सुमारे सव्वा मिटर असून या गर्भगृहाचे प्रवेशद्वारही प्रशस्त आहे....शिवाय प्रशस्त अधिष्ठानावरील या भव्य वास्तुची उंची साधारण ११ मीटरपेक्षा अधिक आहे. मंदीराच्या दर्शनी भागाचे स्वरुप पाहताना वेरुळच्या विश्वकर्मा लेणीची आठवण होते.



मंदिरात भव्य अशी काळया पाषाणाची श्री विष्णूची त्रिविक्रम रुपातली सिंहासनाधिष्ठित मूर्ती असून या मूर्तीचा चेहरा, नाक, डोळे, ओठ प्रमाणबध्द आहेत.....




डोक्यावर मोत्यांच्या झुपक्यांनी खचलेला मुकूट... कानात मोठे कर्णालंकार... गळ्यात वेगवेगळे तीन प्रकारचे हार... बाहूवर बाजूबंद... मनगटावर रुंद नक्षीकाम असणारे कंकण असून या त्रिविक्रमाने उजवा पाय खाली सोडलेला तर डावा बैठकीच्या कडेने उंचावलेला आहे ज्याखाली बली, बलीपत्नी व दैत्यगुरु शुक्राचार्यांच्या मूर्ती आहेत..... त्याच ठिकाणी असलेला कन्नड लिपीतील राजा महामंडलेश्वर जोगमरस यांचा शिलालेख शके १००० मधील असावा असे जाणकारांचे मत आहे..... ..

## भगवान श्री कालेश्वर महादेव मंदीर व येथील इतर मंदीरे :-

यानंतर आपण तेरणेच्या काठी असणा-या इथल्या भक्तीवैभवाच्या मंगलमय परिसराच्या दर्शनासाठी जात आहोत. मुख्य मंदिराबाहेर संत चोखोबा मंदीर... आणि स्वातंत्र्यसेनानी विश्वनाथाप्पा देशमाने याची समाधी आहे... श्री. संत गोरोबा काका व कालेश्वर महादेव मंदिराच्या या पूर्व महाद्वारातून आत गेल्यास उजव्या बाजूस बेलेश्वराचे एक छोटेसे मंदिर असून त्यामध्ये काळ्या पाषाणाचे शिवलिंग आहे..... मंदिराच्या अगदी खाली तळघरासारख्या मंदिरातही शिवपिंड असून ती महंत शंकर गिरीजी महाराजांची समाधी आहे असे म्हणतात.....




तर या पावन परिसराचे पदप्रक्षाळण करणाऱ्या तेरणेच्या बाजूने मंदिराच्या पश्चिम वा  दक्षिण दारातून आत पाऊल टाकल्यास नीलकंठेश्वराचे उत्तराभिमुख पुरातन मंदिर समोर दिसते..... मंदिरासमोर नंदिकेश्वर आणि आतील गाभा-यात शिवपिंड पहावयास मिळते..... पण वैशिष्टय म्हणजे बहुतांशी ठिकाणचे शिवलिंग उत्तराभिमुख आहेत मात्र तेरमध्ये ही दुसरी शिवपिंड आहे की जेथे दिशेचा संकेत मोडत नीलकंठेश्वरास पश्चिमेकडे मुख करुन स्थापन केले आहे.....  पूर्वी पासून तेरमध्ये चारी दिशांना मुख केलेल्या शिवपिंडी व गणेशमूर्ती आहेत असे म्हणतात. प्रदक्षिणा मार्गावर कालेश्वर मंदीराच्या उत्तेरस हराळेश्वराची पिंड... गोमातेची समाधी...  व इतरही कांही शिवलिंग पहावयास मिळतात.....



पण याहीपेक्षा नयनरम्य मंदिर म्हणजे कार्बेलींग पध्दतीतून पुरातनत्वाची साक्ष देणारे कालेश्वर महादेवाचे प्राचीन शिवालय.... या मंदिराचे शिखर दक्षिणात्य द्रविड शैलीचे असून या मंदिराची निर्मिती राष्ट्रकुटांच्या काळातील असावी असे कांही इतिहास संशोधकाचे मत आहे।

तर डॉ. ए. व्ही. नाईक यांच्या मते माहेश्वराचे परमभक्त असणा-या कलचुरी राजवंशाच्या राजवटीत साधारणपणे इ. स. ६१० च्या सुमारास हे मंदीर बांधले गेले असावे...डग्लस बॅरेट मात्र यांस ९ व्या शतकातले मानतात. पुराणकथेनुसार मात्र ऋषी दुर्वास नित्य पूजा करीत असलेले हे मंदीर विश्वकर्म्याने बांधले आहे...

कालेश्वराचे हे देऊळ अंतराळविरहीत असून निमुळते होत जाणा-या चौरस छप्परावर चौरस गर्भगृह व पुढे सभामंडप असे त्याच्या वास्तूचे स्वरुप आहे..... मंदीराच्या बाहयांगावर सर्व बाजूनी मध्ययुगीन काळात बांधलेल्या आधारभिंती असाव्यात. पूर्वी त्या अत्यंत लहान पायऱ्याच्या स्वरुपातले नक्षीकाम असणाऱ्या होत्या.  आता त्या पायऱ्या साफ केलेल्या आहेत. मात्र या आधारभिंतीमुळे मंदिराचे पूर्वीचे बाहयांग सांगता येत नाही..... शिखरावर शालाशिखरे व कूट शिखरे यांनी युक्त असलेले मजले किंवा तळ आहेत... शिवाय वर शिखरामध्येही एक लहानसे मंदिर आहे. ज्यामध्ये छोटे यज्ञकुंड आहे. त्यास कांही लोक सीतामाईच्या वास्तव्याची जागा असल्याचे सांगतात.....  मंदिरासमोरच्या कमानयुक्त मंडपास दरवाजे नसून तो नंतरच्या काळात बसवलेला आहे... या मंदिराच्या बांधकामात व तेर येथील उत्तरेश्वर मंदिराच्या बांधकामात कांही साम्य विशेषत्वाने आढळून येते.

या मंदिरात श्रीसंत गोरोबा काकांचे उत्तराभिमुख तर  श्रीगणेशाचे दक्षिणाभिमुख दगडी शिल्प... व श्री दत्तात्रयाची समाधी असून तिला कांही लोक दुर्वासाची समाधी मानतात... बाजूलाच श्री साईबाबा...  श्री स्वामी समर्थ... श्री गजानन महाराज... व श्री दत्तात्रय यांच्या मूर्ती अलिकडल्या काळात स्थापन केलेल्या आहेत.



समोर नंदी
असणाऱ्या या
राऊळात
कालेश्वराची
तेरणेच्या
पंचक्रोशीतली
सर्वात मोठया
आकाराची
भव्य अशी
सुंदर शिवपिंड
आहे.....

मंदिरावर झालेल्या परकीय आक्रमणात या शिवपिंडीवर लोखंडी पहारेचा प्रहार झाला, तेंव्हा तिथला तुकडा बाजूला पडून आतून रक्त वाहू लागल्याने हे लोक घाबरुन पळाले व मंदिर सुरक्षित राहिले ती आघाताची खूण दाखवत ही लोककथा वृध्दांकडून कथन केली जाते तेच हे भगवान कालेश्वर महादेव.... कालेश्वर मंदिरावर झालेल्या परकीय आक्रमणाची ही लोककथाही या मंदिरात असणाऱ्या विरगळ शिल्पावरुन सत्य असावी असे वाटल्यावाचून रहात नाही.

## वैराग्यमहामेरु संतश्रेष्ठ श्री. गोरोबा काका मंदीर :-

श्री क्षेत्र तेरची खास ओळख असणारे मंदीर म्हणजे श्री संत गोरोबा काकांचे समाधी मंदिर..... संत नामदेव गोरोबा काकांच्या चरित्रामध्ये लिहितात, ' प्रेम अंगी सदा वाचे भगवंत । प्रेमळ तो भक्त कुंभार गोरा।।'..... शके ११८९ ते १२३९ म्हणजेच इसवीसन १२६७ ते १३१७ या कालावधीत विठ्ठल भक्तीने ओतप्रोत भरलेले व प्रभूप्रेमाच्या वर्षावात ओलेचिंब झालेले आयुष्य व्यतीत केलेल्या या महान संताच्या पुर्वाभिमुख मंदिरासमोर पिंपळवृक्ष असून तेथेच हनुमंताची प्रतिष्ठापना केलेली आहे..... मुख्य मंडपातून समाधी मंदिरात प्रवेश करताना बापूजी पाटलांच्या पितळी पायरीचे दर्शन घेऊन आत जाण्याचा प्रघात आहे गोरोबा काकांच्या पुण्यकालानंतर त्यांच्या समाधीची जागा अनेक झाडे व निवडुंगांनी वेढून गेल्यामुळे लुप्त झाली होती. ती श्री विठ्ठलाने एका सज्जनास स्वप्नात दृष्टांत देऊन दाखवली आणि व्यवस्थित करण्याची आज्ञा दिली. त्याने ती समाधी शोधून अनेकांच्या सहकार्याने समाधी मंदीर बांधून घेतले अशी लोककथा सांगितली जाते..... श्री संत गोरा कुंभार यांची ही समाधी म्हणजे भागवत धर्माची भगवी पताका अभिमानाने खांद्यावर मिरवणाऱ्या अनेक वारकऱ्यांचे पवित्र पावन भक्तीपीठ व श्रध्दास्थान.....



समाधी मंदिराच्या पाठीमागे भगवान श्री विष्णू तर समाधीच्या पाठीमागे विठ्ठल रखुमाईची मूर्ती, 'मागे पुढे उभा राहे सांभाळीत' त्याप्रमाणे उभी आहे..... या समाधीवर श्रीसंत गोरोबा काकांचा मुखवटा ठेवलेला असतो.....



राहिला हरी लक्ष्मीसहीत घरी असे संत एकनाथांनी ज्याचे वर्णन केले, ती श्री विठ्ठल रुक्मीणीसह राबल्याची, काकांच्या घराची जागाही गावात आहे..... जिथे कदाचित त्यांच्या कालावधीतील विठ्ठलमूर्ती आपणास पहावयास मिळते... पंढरीचा पांडुरंग काकांच्या घरात अवतरला व सर्व संत तेरमध्ये आले तेंव्हा तो गुप्त झाला त्याक्षणी ही स्वयंभू विठ्ठलमुर्ती प्रकट झाली असे म्हणतात. अशा या वैराग्यमहामेरुमुळेच तेरणेच्या काठावरील या नगरीस वैराग्यनगरी असे संबोधले जात असून सत्यपुरी ही काकांमुळे खऱ्या अर्थाने संतपुरी झाली, कारण हा संतराजच संपूर्ण संताच्या मांदियाळीतला एक स्वतंत्र अस्तित्वाचा, आगळा वेगळा तत्वनिष्ठ त्यागी परमभक्त, परमउपदेशक वैराग्यसूर्य व संतपरीक्षक होता हे त्यांच्या समकालीन संतांनी मान्य केले आहे.....

प्रतिवर्षी चैत्र वद्य त्रयोदशीला गोरोबा काकांच्या पुण्यतिथीनिमित्त समाधी मंदीर परिसरात मोठी यात्रा भरते. शिवाय संपूर्ण वर्षभरही केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभरातून श्रध्दावंत, पर्यटक,अभ्यासक, संशोधक असे विविध लोक मोठया संख्येने तेर दर्शनासाठी येतात..... प्रसादस्वरुप समाधानाच्या अपेक्षेने आपणही किमान एकदा तरी या इतिहासप्रसिध्द सुवर्णनगरीस भेट द्याल, हीच स्नेहपूर्वक अपेक्षा..... ..

- **<u>संदर्भग्रंथ सुची</u>**


- तेर - प्रा. शां. भा. देव
- सातवाहनकालिन महाराष्ट्र - प्रा. रा. श्री. मोरवंचीकर
- मराठवाडयाचा इतिहास - प्रा. सोमनाथ रोडे
- सुवर्णनगरी तेर - प्रा. सुलभा जामवडीकर
- लज्जागौरी - रा. चिं. ढेरे
- तेर गौरव ग्रंथ - (इतिहास परिषद) - प्रकाशक - ते.प.चॅ.ट्रस्ट, उस्मानाबाद.
- मराठवाडा एक शोध - अरुणचंद्र पाठक
- सातवाहनकालिन भौतिक संस्कृती - डॉ.गौतम पाटील, डॉ. अनिल कठारे
- प्राचिन शिव आणि जैन मंदिरे - प्रा. पाटील,डॉ. साबणे, डॉ. कठारे
- सकलसंतवाणी खंड - २ - गिताप्रेस गोराखपूर
- दक्षिणेतील मथुरा तेर - ॲड. राज कुलकर्णी

- म्हणे गोरा कुंभार - प्रा. वेदकुमार वेदालंकार
- सत्यपुरी महात्म्य - एक हस्तलिखीत ग्रंथ
- गोरोबा चरित्रामृत - सदाशिव पाटील पिंपरीकर
- अभंग - श्री संत गोरोबा काका
- नामदेवाची गाथा - गीता प्रेस गोरखपूर
- श्री. गोरा कुंभार चरित्र - प्रा. र. रा. गोसावी, वीणा गोसावी
- भक्तीविजय - महिपती
- बालाघाटची साद - भारत गजेंद्रगडकर
- आणि कांही मासिकांचे, वृत्तपत्रांचे लेख यासह इतर संदर्भ .


*****